| MHRG080003612016 | **नि.दरखास्त क्र. ४/२०१६**<br>श्री. जितेंद्र गोवर्धनदास तन्ना **...धनको...**<br>**... वि...**<br>श्रीमती सुलोचना पंढरीनाथ नगरकर...**ऋणको...** |
|---|---|

**निशाणी क्र. ३७ वर आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज हरकतदार यांनी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे :—

धनको यांनी दरखास्तीमध्ये सर्वे क्र. १०/३अ या एकुण क्षेत्रापैकी ०. ४५ आर. क्षेत्राचे खरेदीखत होवून मिळण्यासाठी दरखास्त दाखल केलेली आहे. प्रस्तुत हरकतदार यांची पत्नी या आबाजी फावडे यांच्या वारस असून त्यांनी रे. दि.मु. क्र. १०८/२०१७, १०७/२०१७ व ९९/२०१७ दाखल केलेले आहेत. त्या दाव्यांमध्ये सर्वे क्र. १०/३अ ही मिळकत धनकोला ॲवॉर्ड प्राप्त मिळकत आहे. त्या मिळकतीचे हिंदू वारसाप्रमाणे वाटप झालेले नाही. त्यामुळे प्रस्तुत हरकतदारास दरखास्तीत सामिल करुन घेण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तुत धनको व इतर दाव्यांमध्ये प्रतिवादी यांनी संगणमत करुन तडजोड केलेली आहे. परंतु हरकतदार व त्यांच्या वारसांना दरखास्तीत सामिल करुन घ ेतल्यास हरकतदारावर अन्याय होणार नाही. तसेच प्रस्तुत दरखास्तीस स्थगिती मिळावी अशी मागणी देखील प्रस्तुत अर्जात केलेली आहे.

३. धनको तर्फे निशाणी ४० वर प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे. धनकोच्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकूर काल्पनिक आहे. रे.दि.मु. क्र. १०७/२०१७ यामध्ये तडजोड पुरशीस दाखल असून त्यामध्ये अर्जदारच्या पत्नीची व मुलाची सही असून त्यामध्ये सर्वे क्र. १०/३/अ/१ ही मिळकत धनकोच्या एकट्याच्या मालकीची आहे हे मान्य केलेले आहे. त्या पुरशीसवर वादीच्या वकीलांची देखील सही आहे. रे.दि.मु. क्र. ९९/२०१७ या

दाव्याचा प्रस्तुत दरखास्तीशी काहीही संबंध नाही. प्रस्तुत हरकतदार यांना दरखास्तीस हरकत घेण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा दरखास्तीचे कामकाज लांबण्यासाठी दिलेला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा असे नमूद केलेले आहे.

४. धनको व हरकतदार यांच्यातर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता हरकतदार यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहीतेच्या कोणत्या तरतुदीनुसार दाखल केलेला आहे याचा उल्लेख केलेला नाही. तसेच प्रस्तुत अर्जात हरकतदार यांनी त्यांना पक्षकार म्हणून सामिल करुन घ्यावे व दरखास्त स्थगित ठेवावी अशा दोन मागण्या केलेल्या आहेत. सदर मागण्यांच्या अनुषंगाने दरखास्तीचे अवलोकन केले असता प्रस्तुत दरखास्तीमधील रे.दि.मु. नंबर ३३/१९८२ या हुकूमनाम्याची अंमलबजावणी होण्यासाठी सदरची दरखास्त दाखल केलेली आहे. सदर न्यायनिर्णयावर मा. उच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल करण्यात आलेले होते. त्यामध्ये केलेल्या आदेशाप्रमाणे सदरची दरखास्त दाखल झालेली आहे. अशी परिस्थिती असताना हरकतदार यांनी कोणतेही ठोस कारण नमूद न करता प्रस्तुतची दरखास्त सींगित करण्याबाबत मागणी केलेली आहे. प्रस्तुत न्यायालयास हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकारक्षेत्र आहे. दरखास्त स्थगित करण्याचे अधिकारक्षेत्र नाही.

६. हरकतदार यांनी त्यांना या दरखास्तीमध्ये पक्षकार करुन घेण्याबाबत मागणी केलेली आहे. परंतु सर्वे क्र. १०/३/अ/१ या मिळकतीबाबत त्यांना कोणत्या न्यायालयाने मालकी ठरवून दिलेली आहे याबाबत कोणतेही कागदपत्रे अभिलेखावर नाहीत. तसेच मा. उच्च न्यायालयानंतर सर्वोच्च न्यायालयात दाद मागितल्याचे व स्थगिती असल्याचे देखील कागदपत्रे अभिलेखावर नाहीत. अशा परिस्थितीत सन १९८२ मध्ये करण्यात आलेल्या हुकुमनाम्याची अंमलबजावणी होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत

करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज निशाणी क्र. ३७ नामंजूर करणेत येतो.

Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2025.12.18 11:01:24 +0530

**( एस. एस. देशमुख )**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
खालापुर.

स्थळ :— खालापुर.
दिनांक :— १७/१२/२०२५.

**<u>Certificate</u>**

I affirm that, the contents of the P.D.F. file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Smt. S. S. Deshmukh<br>CJJD & JMFC, Khalapur |
| Name of Steno | : | Shri. Rakesh S. Patil<br>Stenographer, Grade – III |
| Date of Order | : | 17/12/2025 |
| Order signed by P. O. On | : | 17/12/2025 |
| Date of PDF & Order uploaded on | : | 17/12/2025 |